| CNR No.**MHKO200001822022** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल तारीख | – | २६ | ०५ | २०२२ |
| | नोंदणी तारीख | – | २६ | ०५ | २०२२ |
| | निकाल तारीख | – | १२ | ०५ | २०२६ |
| | कालावधी | | वर्ष | महिने | दिवस. |
| | | | | | |

**<u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर</u>**
**<u>यांचे न्यायालयात( पिठासीन अधिकारी व्ही.ए.लावंड–कोकाटे )</u>**

**<u>नियमित फौजदारी खटला क्रमांक ३३/२०२२.</u>**
**न्यायनिर्णय निशाणी क्रमांक ५६/ ब.**
**न्यायनिर्णय घोषीत दिनांक– १२ मे २०२६**

कळे पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रं.२३/२०२२ भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, ३२४, ३२३, ५०४ सह कलम १४९ प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी/तक्रारदार | | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत कळे पोलीस ठाणे,<br>ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर |
| अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता | | ॲड. श्री. पी.एच.सावंत |
| आरोपी | १. | अजित महादेव गुरव, व.व.३१ |
| | २. | उत्तम उर्फ गोटया महादेव गुरव, व.व.३२, |
| | ३. | गणेश बबन गुरव, व.व.२६, |
| | ४. | महादेव ज्ञानु गुरव, व.व.५८, |
| | ५. | बबन ज्ञानु गुरव, व.व.५५ |
| | | सर्व रा.गुरव गल्ली, घरपण, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर |
| आरोपींतर्फे वकील | | ॲड. श्री. एस. व्ही. खोत |

**<u>भाग–ब</u>**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २२.०३.२०२२ |

| | | |
|---|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | :– | २२.०३.२०२२ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २६.०५.२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :– | २०.०७.२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | ०७.०७.२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | – |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | १२.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | – |

## आरोपींची माहिती

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायेजित (Set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अजित महादेव गुरव, | २३.०३.२०२२ | २३.०३.२०२२ | भा.दं.सं. कलम १४३, १४७, ३२४, ३२३, ५०४ सह कलम १४९ प्रमाणे | निर्दोष मुक्तता | – | – |
| २. | उत्तम उर्फ गोटया महादेव गुरव, | २३.०३.२०२२ | २३.०३.२०२२ | | निर्दोष मुक्तता | – | – |
| ३. | गणेश बबन गुरव, | २३.०३.२०२२ | २३.०३.२०२२ | | निर्दोष मुक्तता | – | – |
| ४. | महादेव ज्ञानु गुरव, | २३.०३.२०२२ | २३.०३.२०२२ | | निर्दोष मुक्तता | – | – |
| ५. | बबन ज्ञानु गुरव, | २३.०३.२०२२ | २३.०३.२०२२ | | निर्दोष मुक्तता | – | – |

## भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | संदिप गंगाराम देसाई | फिर्यादी | २६ |

**ब–बचावपक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| – | – | – | – |

**क. न्यायालयामार्फत**

| सा.क्रं. | साक्षीदारांचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

**अभियोगपक्षातर्फे/बचावपक्षातर्फे/न्यायालयातर्फे कागदपत्रांना देण्यात आलेल्या निशाणी**

**अ. अभियोग पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | २८ (सा.क्र.१) | फिर्याद |
| २. | २९ (सा.क्र.१) | छापील प्रथम खबरी अहवाल |
| ३. | ४७ (आरोपी तर्फे मान्य) | घटनास्थळ पंचनामा |

**ब. बचाव पक्षामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ४६ | मुळ फिर्यादी व आरोपींतर्फे तडजोड करणेस परवानगी अर्ज |
| २. | ४९ | मुळ फिर्यादी व आरोपींतर्फे आपसात तडजोड झाली असलेबाबत पुरसीस |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |
| २. | १३ | दोषारोप |
| ३. | ५१ ते ५५ | आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन |

**ड. भौतिक वस्तु**

| अ.क्रं. | मुद्देमाल अर्टीकल नं. | वर्णन |
|---|---|---|
| १. | संयुक्तीकरित्या आर्टीकल अ | एक चिव्याची काठी तिची लांबी ३४ इंच व चार गाठी असलेली |
| २. | | एक चिव्याची काठी तिची लांबी २९ इंच व पाच गाठी असलेली |

## न्या य नि र्ण य
## (दिनांक २३ एप्रिल, २०२६ रोजी घोषित केले)

आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३,१४७,३२४,३२३,५०४ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केल्याची चौकशी झालेली आहे.

**०२.** अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की, दि.२२.०३.२०२२ रोजी ते नेहमीप्रमाणे सकाळी ५.४५ च्या सुमारास घरातून बाहेर पडून त्यांच्या आजूबाजूच्या भागातील दुध गोळा करणेकरीता टॅम्पो क्रं.एम.एच.११–टी–००९१ मधून दुध गोळा करून अंदाजे सकाळी ८ वाजताच्या सुमारास गावातील संस्थेचे दुध संकलन करण्याकरीता आले. त्यांनी नेहमीप्रमाणे गुरव गल्लीच्या तोंडावर टॅम्पो रिव्हर्स मारून टॅम्पो संस्थेपर्यंत नेला. गुरव गल्लीच्या तोंडलाच अजित महादेव गुरव व त्यांचे भाउबंधाचे घरे आहेत. परंतु टॅम्पो रिव्हर्स घेतेवेळी त्या ठिकाणी त्यांच्या घरातील कुणीच दारात नव्हते. त्यांनी संस्थेत पोहोचल्यानंतर भाऊ प्रदीप हा त्यांचा जेवणाचा

डबा घेवून आला. त्या तिघांनी कॅन भरली. त्यानंतर ते टॅम्पो चालवित गुरव गल्लीतून बाहेर पडले. त्यांच्या शेजारीच अमर बसला होता व प्रदीप मागे हौदात बसला होता. गल्लीच्या तोंडाला येवून गाडी वळवली त्यावेळी गुरवांचे घर हे कॉर्नरला असल्याने त्यांनी पाठीमागे हौदात बसलेल्या प्रदीपला बघितले. तसेच त्यांचे घरातील अजित महादेव गुरव, गोटया महादेव गुरव, गणेश बबन गुरव, महादेव ज्ञानू गुरव, बबन ज्ञानू गुरव असे सर्वजण पळत येवून त्यांनी मागे हौदात बसलेल्या प्रदीपला खाली ओढताना त्यांनी टॅम्पोतील आरशातून बघितले व लगेच गाडी साईडला लावली. त्यानंतर त्यांनी व अमरने दोघांनी खाली उतरून बघितले तेव्हा गुरवांच्या घरातील लोक हे प्रदीपला मोठयामोठयाने शिव्या देत लाथा बुक्क्यांनी मारहाण करीत होते. त्यांच्या पैकी दोघांच्या हातात काठया होत्या. वादावादी चालू असताना गणेश बबन गुरव याने प्रदीप च्या नाकावर काठीने मारल्याचे त्यांनी बघितले. त्यांच्या नाकातून रक्त येवू लागल्याने ते दोघे त्यांना सोडविण्यासाठी गेले असता त्यांच्यातील अजित महादेव गुरव यांनी त्यांना काठीने पायावर मारले. त्यामुळे त्यांच्या उजव्या पायाला जखम झाली. जमलेल्या लोकांनी त्यांची भांडणे सोडविली. भांडणे सोडविल्यानंतर ते व प्रदीप असे दोघेही कळे पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी आले होते.

**०३.** पुढे असे की, दि.१५.०३.२०२२ रोजी त्यांच्या टॅम्पोखाली अजित गुरव यांची मुलगी सापडून त्यात ती मयत झाल्याने त्याचा राग मनात धरून दि.२२.०३.२०२२ रोजी सकाळी ८.१५ च्या सुमारास त्यांनी व्यंकटेश्वरा दुध संस्थेतील दुध संकलन करून गोकुळ शिरगाव येथे जात असताना गुरव गल्ली कॉर्नर, घरपण, ता. पन्हाळा याठिकाणी अजित महादेव गुरव, गोटया महादेव गुरव, गणेश बबन गुरव, महादेव ज्ञानू गुरव, बबन ज्ञानू गुरव या सर्वांनी बेकायदेशीर एक जमाव करून शिवीगाळ करून फिर्यादीचा भाऊ प्रदीप धोंडीराम देसाई यास टॅम्पोतून खोली ओढून लाथा बुक्क्यांनी तसेच त्यांच्यापैकी गणेश बबन गुरव याने प्रदीप यांच्या नाकावर काठी मारली आहे. प्रदीप देसाई यांनी भांडणाची सोडवासोडव केली असता त्यांच्यातील

अजित गुरव यांनी त्यांना काठीने मारले आहे. सबब त्यांनी आरोपीविरूध्द कळे पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.

**०४.** फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन आरोपींविरुध्द कळे पोलीस ठाणे गु.र.क्र.२३/२०२२ भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, १४७, ३२४, ३२३, ५०४ सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा नोंद झाला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल एम.डी.माळवदे यांनी केला असुन त्यांनी तपासा दरम्यान घटनास्थळ पंचनामा केला, मुद्देमाल पोलीस ठाणेत जमा केला, साक्षीदारांचे तपास टिपण्णे नोंदवली, जखमींची वैदयकीय प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे प्राप्त करुन कामात सामील केली व केलेल्या तपासाअंती आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले आहे.

**०५.** आरोपींविरुध्द नि.क्र.१३ नुसार भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, ३२४, ३२३, ५०४, सह कलम १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याचा दोषारोप ठेवला. आरोपींना दोषारोप मराठीत वाचून व समजावून सांगण्यात आला असता त्यांनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविल्याने तसे त्यांचे निवेदन नि.क्र.१४ ते १८ वर नोंदविण्यात आले.

**०६.** अभियोगपक्षाने आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरिता एक साक्षीदाराचा साक्षीपुरावा तपासला असुन अभियोगपक्षाने काही कागदोपत्री पुराव्यांचा देखील आधार घेतला असुन त्यांचा उल्लेख पुढे विश्लेषनादरम्यान योग्य त्याठिकाणी करण्यात आला आहे. पुरेशी संधी दिलेनंतर नि.क्र.१ कडील दि.०६/०४/२०२६ रोजीचे आदेशाने अभियोगपक्षाचा पुरावा बंद करणेत आला. तद्नंतर आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे निवेदन नि.क्र.५१ ते ५५ कडे नोंदवले असता आरोपींनी खोटी केस केल्याचा बचाव घेतला परंतु, आपल्या बचावापृष्ठयार्थ कोणताही साक्षीदार तपासला नाही. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपींतर्फे विधिज्ञांचा

युक्तीवाद ऐकला.

**०७.** उपलब्ध पुराव्यावरुन खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष त्या खालील नमूद कारणानुसार नोंदविले आहेत–

| अ.क्र. | <u>प्रश्नबिंदू</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, दि.२२/०३/२०२२ रोजी सायंकाळी ८.१५ वाजताचे सुमारास घरपण, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील फिर्यादी संदीप गंगाराम देसाई यांचे घरासमोर आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा की ज्याचा सामाईक उद्देश फिर्यादी व साक्षीदार यांना मारहाण किंवा हल्ला करणेचा उद्देश असलेल्या जमावाचा घटक होते व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम १४३ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला? | नकारार्थी. |
| २. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व त्यांनी बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी बलप्रयोग किंवा हिंसाचार करुन दंगा करुन फिर्यादी व साक्षीदार यांचेवर हल्ला करुन मारहाण केली व त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम १४७ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी. |
| ३. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपी नं. ३ ने साक्षीदार प्रदीप यांना काठीने मारले व आरोपी क्रं. २ ने साक्षीदार अजितला काठीने मारले. आरोपी क्रं. १ ने फिर्यादी संदीप गंगाराम देसाई यांना त्यांच्या उजव्या पायावर काठीने मारहाण केली. सदरचे हत्यार वापरलेस मृत्यू होईल अशा काठीने साक्षीदारांना व फिर्यादी यांना मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापत | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | पोहोचवली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ३२४ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला? | |
| ४. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपींनी साक्षीदार यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन ईच्छापूर्वक दुखापत पोहोचवली व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड सहिता कलम ३२३ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा केला ? | नकारार्थी |
| ५. | अभियोग पक्षाने हे शाबीत केले का की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन त्यांचा उद्देशपुर्वक अपमान करुन त्यांचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल असे प्रक्षोभीत केले व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहिता कलम ५०४ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी. |
| ६. | आदेश काय ? | आरोपी क्रं.१ ते ५ याना निर्दोषमुक्त करणेत येते. |

## <u>का र ण मि मां सा</u>

### <u>प्रश्नबिंदू क्र.१ ते ५ करीताः</u>

**०८.** ज्याअर्थी प्रश्नबिंदू क्र.१ ते ५ मधील नमुद अपराधासंदर्भातील वस्तुस्थिती व पुरावा हा एकमेकांशी संबंधीत आहे, त्याअर्थी या संदर्भातील विश्लेषणात्मक पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदर प्रश्नबिंदूंचे विश्लेषण एकत्रित केले आहे. अभियोगपक्षाने संबंधित अधिनियमातील कलमांच्या परिभाषेत आरोपींचे कृत्य येते हे शंकेपलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. हे पाहण्याकरीता अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन करणे आवश्यक आहे.

**०९.** प्रस्तुत प्रकरणातील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाचे मुख्य साक्षीदार क्र.१ संदीप गंगाराम देसाई **(फिर्यादी/नि.क्र.२६)** यांनी त्यांचे मौखीक पुराव्यात असे कथन केले आहे की, आरोपी क्रं. १ ते ४ हे घरपण येथे तर आरोपी क्रं. ५ जोतीबा येथे राहतात. प्रदीप धोंडीराम देसाई हे त्यांचे चुलत भाउ असून ते देखील घरपण येथे राहतात. ते व प्रदीप देसाई दोघेही टॅम्पो चालवतात. सदर टॅम्पोमधून ते दुधाची वाहतूक करतात. सदरचे दुध ते प्रत्येक गावातून गोळा करून ते संघाला जमा करण्याचे काम करतात. त्यांच्याकडे टॅम्पो क्रं. एम.एच. ११ टी ००९१ हा टॅम्पो आहे. ते सदरचे दूध गोकुळ दुध संघ, गोकुळ शिरगांव येथे घालतात. त्यांच्या गावात गुरव गल्लीत दुध डेअरी असून सदर दुध डेअरीच्या ठिकाणी त्यांना त्यांचा टॅम्पो दुधाचा कॅन टाकण्याकरीता उलट दिशेने मागे घ्यावा लागतो. त्यानंतर त्याच्यात दुधाचे कॅन भरून तो गोकुळ शिरगांव येथील दुध संघात न्यायला लागतो. मार्च २०२२ मध्ये त्यांचा भाउ प्रदीप देसाई सदर टॅम्पो रिव्हर्स घेत असताना अपघात झाला. सदर अपघातात अजित गुरव यांची मुलगी मयत झाली होती.

**१०.** अभियोपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ संदीप गंगाराम देसाई यांचे मौखीक पुराव्यामध्ये पुढे असे आले आहे की, दि.२१.०३.२०२२ रोजी प्रस्तुत प्रकरणातील वाहन टॅम्पो न्यायालयाच्या सुपुर्तनाम्याद्वारे ताब्यात देण्यात आला होता. दि.२२.०३.२०२२ रोजी त्याने त्यांच्या गावातील गुरव गल्ली याठिकाण दुध भरण्यासाठी सकाळी ८ चे सुमारास गेला असता त्यावेळी सदरचा टॅम्पो ते चालवत होते. सदर साक्षीदार दुध घेवून बाहेर पडल्यावर त्यांचा भाउ प्रदीप देसाई हा त्यांचा डबा घेवून आला. प्रदीप हा टॅम्पोमध्ये पाठीमागील बाजूस हौदात बसला होता. त्यांचा टॅम्पो अजित गुरव यांच्या घराजवळ आल्यानंतर त्यांचा भाऊ प्रदीप देसाई याला अजित गुरव, बबन गुरव, महादेव गुरव, गणेश गुरव व गोटया गुरव यांनी मारहाण करण्यास सुरूवात केली. त्यानंतर ते टॅम्पोमधून खाली उतरले. सर्व आरोपींनी त्यांच्या भावाला काठीने मारहाण केली होती. गणेश गुरव याने त्यांच्या भावाच्या नाकावर

काठीने मारल्यामुळे त्याच्या नाकातून रक्त येत होते. त्याठिकाणी जमलेल्या लोकांनी सोडवासोडव केली. त्यानंतर ते कळे पोलीस स्टेशनला आले. पोलीसांनी त्यांना ग्रामीण रूग्णालय कळे याठिकाणी जाण्यास सांगितले. त्यानंतर त्यांना पुढील उपचाराकरीता सी.पी. आर. हॉस्पीटल कोल्हापूर याठिकाणी जाण्यास सांगितले. त्यानुसार प्रदीप देसाई यांनी सी.पी. आर. येथे उपचार घेतले. त्यानंतर त्यांनी नि. २८ वरील फिर्याद कळे पोलीस स्टेशनमध्ये दिली. नि. २९ वर छापील प्रथम खबरी अहवाल दाखल आहे. घटना घडतेवेळी त्यांच्यासोबत त्यांच्या टॅम्पोचा बदली ड्रायव्हर अमर याने घटना पाहिलेली आहे. त्याचबरोबर आर्टिकल अ वरील काठया देखील पाहिलेल्या आहेत.

**११.** अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.१ संदीप गंगाराम देसाई यांनी आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात असे कबूल केले की, गणेश देसाई व बाळासो देसाई हे त्यांच्या भावकीतील आहेत. ते ड्रायव्हींग व्यवसाय करीत असल्याबाबतचे ड्रायव्हींग लायसन्स व गोकुळ दुध यांच्याकडे काम करत असल्याबाबतचा करार त्यांनी अभिलेखावर दाखल केलेला नाही. तसेच त्यांचा भाउ देखील गोकुळ दुध यांच्याकडे काम करीत असल्याबाबत करार अभिलेखावर दाखल केलेला नाही. टॅम्पोचे आर.सी. बुक किंवा छायांकित प्रत त्यांनी व्यक्तिशः पोलीसांना दिलेले नाही. ते व आरोपी हे एकाच गावातील आहेत. गुरव गल्लीत अंदाजे १० ते १५ घरे आहेत. गुरव गल्लीच्या एका साईडला गटारी आहेत. दुस–या साईडला गटारे नाहीत. गुरव गल्लीला रस्ता करू नये म्हणून बीडकर यांनी कळे न्यायालयात दावा दाखल केला असून तो न्यायप्रविष्ट आहे. दुधाने भरलेले कॅन वेळेवर दुध संघाला पोहोचवले नाहीत तर वाहन चालकाला जबाबदार धरले जाते. त्यांच्याकडे असलेल्या टॅम्पाचे मॉडेल ४०७ आहे. दि. २२.०३.२०२२ रोजी दिलेली तक्रार त्यांनी गैरसमजुतीतून दिली होती. दि. २२.०३.२०२२ रोजी दिलेल्या तक्रारीतील मजकूर त्यांना काय नमूद केलाय याविषयी त्यांना माहित नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्यात व आरोपींमध्ये कोणतेही वाद राहिलेले नाहीत. त्यांनी व आरोपींनी त्यांच्यातील संबंध भविष्यात चांगले रहावे

याकरीता न्यायालयाबाहेर दाखल असलेल्या सर्व प्रकरणामध्ये तडजोड केलेली आहे. पोलीसांनी कोणत्या साक्षीदारांचे जबाब नोंदवून घेतले याविषयी त्यांना माहित नाही.

**१२.** आरोपींचे विधीज्ञांनी नि. ४६ वर तडजोड करण्याचा परवानगीचा अर्ज दाखल केला असून त्यावर अभियोग पक्षाचे म्हणणे घेतले व सदरचा अर्ज नामंजूर करण्यात आला. आरोपी क्रं. १ ते ५ यांनी त्यांच्यात व फिर्यादीमध्ये आपसात तडजोड झाली असल्याचे पुरसीस नि. ४९ वर दाखल केलेली आहे.

**१३.** एकंदरीत अभिलेखावरील अभियोगपक्षाच्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता, साक्षीदार क्र.१ फिर्यादी संदीप गंगाराम देसाई यांच्यात व आरोपींमध्ये सर्व प्रकरणांच्या बाबतीत न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झाली असून त्यांचे व आरोपींचे भविष्यातील संबंध चांगले राहण्याच्या दृष्टीने त्यांनी सर्व प्रकरणांमध्ये तडजोड केल्याची बाब समोर येते. प्रस्तुत प्रकरणातील मुद्देमाल काठया या अपील कालावधीनंतर त्यांचा नाश करणे उचित होईल. अशा परिस्थितीमध्ये अभियोगपक्षाचा पुरावा हा आरोपींनी त्यांचेवर दोषारोपीत केलेला गुन्हा केला आहे हे सिध्द होण्यास पुरेसा नाही किंबहुना सुसंगत नाही. अभियोगपक्षाने कायद्याप्रमाणे फिर्यादीचे संपुर्ण कथन संशयापलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे. उपरोक्त सर्व कारणांमूळे हे न्यायालय या निष्कर्षाप्रत आले आहे की, आरोपी हे बेकायदेशीर जमावाचा घटक होते व बेकायदेशीर जमावाचे समान उद्दिष्ट साधण्यासाठी आरोपींनी फिर्यादी यांना जिवे मारण्याची धमकी देवुन फौजदारी पात्र गुन्हा केल्याने व फिर्यादी व साक्षीदार यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्याचा फायदा निश्चितच आरोपींच्या पक्षात जातो सबब, वरील सर्व विवेचनांचा विचार करता **<u>प्रश्नबिंदू क्रं.१ ते ५ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे.</u>**

**<u>प्रश्नबिंदू क्र.६ करीताः</u>**

**१४.** प्रश्नबिंदू क्र.१ ते ५ च्या उत्तरानुसार अभियोगपक्षाद्वारे भारतीय दंड संहिता कलम १४३,१४७,३२३,३२४,५०४ सह कलम १४९ प्रमाणे आरोपींवर

असलेले आरोप सिध्द होण्याइतपत कोणताही सबळ व विश्वासार्ह साक्षी पुरावा प्रस्तुत प्रकरणात आलेला नसल्यामुळे सर्व आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सदर गुन्हयातील जप्त मुद्देमाल एक चिव्याची काठी ही आजरोजी मूल्यहिन व निरुपयोगी असल्याने त्यांचा अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणे न्यायोचित होईल. सबब, प्रश्नबिंदू क्र.५ चे उत्तरार्थ पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे–

## आदेश

१. आरोपी क्र.१ अजित महादेव गुरव, आरोपी क्र.२ उत्तम उर्फ गोटया महादेव गुरव, आरोपी क्रं.३ गणेश बबन गुरव, आरोपी क्र.४ महादेव ज्ञानु गुरव, आरोपी क्र.५ बबन ज्ञानु गुरव, सर्व रा. गुरव गल्ली, घरपण, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, १४७, ३२४, ३२३, ५०४ सह कलम १४९ प्रमाणे चे अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

२. आरोपींची वैयक्तीक व जामीन बंधपत्रे रद्द करण्यात आले आहेत.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे पूर्तता करणेकामी प्रत्येकी रु.१५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व तेवढयाच रकमेचा जामीन दयावा.

४. जप्त एक चिव्याची काठी तिची लांबी ३४ इंच व चार गाठी असलेली दुसरी चिव्याची काठी तिची लांबी २९ इंच व पाच गाठी असलेली आजरोजी मूल्यहिन व निरुपयोगी असल्याने तिचा अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणेत यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by Vaishali Amol Lavand-Kokate
Date: 2026.05.12 18:22:13 +0530

(व्ही.ए.लावंड–कोकाटे)

दिनांक –१२.०५.२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कळे–खेरीवडे. कळे–खेरीवडे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर